2 9 JUN 2023 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत कुलगुरू प्रा. डॉ. डी.टी. शिर्के, प्र.कुलगुरू प्रा. डॉ. पी.एस. पाटील व कुलसचिव प्रा. डॉ.व्ही.एन. शिंदे उपस्थित होते.

# तंत्रज्ञान अधिविभागाच्या ११० विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांत निवड

## शिवाजी विद्यापीठ : सरासरी ३ ते ८ लाख रुपयांचे पॅकेज

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामधून २०२२-२३ यावर्षी ११० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राइव्हमधून अनेक राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विविध पदांवर निवड झाली. या विद्यार्थ्यांना साधारणपणे वर्षाला ३ ते ८ लाखांची पॅकेजेस दिले आहे. हे विद्यार्थी अधिविभागामधील विविध अभियांत्रिकी शाखांमधून पदवीच्या शेवटच्या वर्षाचे शिक्षण घेत आहेत.

औद्योगिक क्षेत्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या मोठ्या वापरामुळे अभियांत्रिकी क्षेत्रातील रोजगारांचे प्रमाण वाढले आहे. त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान व नावीन्यपूर्ण अभियांत्रिकी शिक्षण, अधिविभागात दिले जाते. विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्राला पूरक व रोजगार संधी उपलब्ध होण्यासाठी विभागाचे प्लेसमेंट सेल अधिकारी व सहकारी सतत प्रयत्नशील असतात.

अधिविभागात अभियांत्रिकीमधील प्रामुख्याने केमिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, फूड टेक्नॉलॉजी आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग या शाखांचे शिक्षण दिले जाते. संचालक प्रा. डॉ.एस.एन. सपली, विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल अधिकारी गणेश पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.

2 9 JUN 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दीड लाख चौरस मीटर बांधकाम; सुमारे २७ कोटी रुपयांचा खर्च

# विद्यापीठात उभारणार पाच नव्या इमारती

▶ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २८ : येत्या दोन वर्षांत शिवाजी विद्यापीठात पाच नव्या इमारती उभारण्यात येतील. त्यात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग, विद्यार्थी विकास विभागाचे कार्यालय आणि वसतिगृह, क्रीडा वसतिगृहाच्या इमारतींचा समावेश आहे. विद्यापीठ कॅम्पसमध्ये दीड लाख चौरस मीटरचे बांधकाम होईल. त्यासाठी सुमारे २७ कोटी रुपयांचा खर्च होणार आहे.**

विद्यापीठातील अधिविभागांच्या विस्ताराची गरज लक्षात घेवून अद्ययावत अशा इमारतींची उभारणी करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. त्यातील काही इमारतींसाठी राज्य शासनाने निधी दिला आहे, तर काही इमारतींसाठीच्या निधीची तरतूद विद्यापीठाने स्वःनिधीतून केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या इमारती साकारण्यात येणार आहेत.

विद्यापीठ कॅम्पसमधील सायबर सिक्युरिटी आणि तंत्रज्ञान अधिविभागाच्यामध्ये असणाऱ्या जागेत यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटची तीन मजली, तर वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाची तीन मजली इमारत होईल. त्यातील स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे बांधकाम सुरू झाले आहे. वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या इमारतीचे भूमिपूजन शुक्रवारी (ता. ३०) सकाळी साडेदहा वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. दूरशिक्षण केंद्राशेजारील जागेत विद्यार्थी विकास विभागाची नवी इमारत साकारण्यात येणार आहे. त्याठिकाणी या विभागाचे दोन मजली कार्यालय आणि स्वतंत्र वसतिगृहाची पाच मजली इमारत उभारणार आहे. या सर्व नव्या इमारतींमुळे अद्ययावत सुविधांसह विद्यार्थ्यांना शिक्षण देणे शक्य होणार आहे.

केंद्र सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना विद्यापीठात पायाभूत सुविधांचा विकास करावा लागणार आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाने विविध अधिविभागांची गरज लक्षात घेऊन तयारी सुरू केली आहे.

### तीनमजली क्रीडा वसतिगृह

▪ क्रिकेट पॅव्हेलियन परिसरात तीनमजली क्रीडा वसतिगृह साकारणार आहे. त्यामुळे विद्यार्थी खेळाडूंच्या निवासाची व्यवस्था विद्यापीठात होईल. या इमारतीचे एकूण ३० हजार चौरस मीटर इतके बांधकाम होणार असून, त्यासाठी तीन कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या नव्या पाच इमारतींचे बांधकाम पुढील दोन वर्षांत पूर्ण करण्याचे ध्येय असल्याचे विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागाचे प्रभारी उपकुलसचिव रणजित यादव यांनी सांगितले.

“ नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना बहुविद्याशाखीय, आंतरविद्याशाखीय शिक्षण पदवी, पदव्युत्तर, संशोधन पातळीवर विद्यापीठाला महत्त्व द्यावे लागणार आहे. त्यादृष्टीने पायाभूत सुविधांचा विकास आणि अधिविभागांची गरज लक्षात घेऊन या नव्या इमारतींच्या उभारणीचा निर्णय विद्यापीठाने घेतला.

**- डॉ. विलास शिंदे,** प्रभारी कुलसचिव

29 JUN 2023 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा गांधींची शैक्षणिक संकल्पना आजही अबाधित

## ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत पद्मश्री डॉ. अभय बंग यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिक्षणाच्या बाबतीत खडबडून जागे व्हावे, अशी स्थिती आज समोवतालामध्ये आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष जीवनात घडणाऱ्या शिक्षणाला नई तालीमचे स्वरुप देणाऱ्या गांधीजींच्या शैक्षणिक संकल्पनेची प्रस्तुतता अबाधित आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत पद्मश्री डॉ. अभय बंग यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात 'आजचे शिक्षण आणि महात्मा गांधी यांचे उपाय' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानीं कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर व डॉ. नंदा पारेकर लिखित 'महात्मा गांधी आणि त्यांचे सांगाती' आणि विजय तांबे लिखित 'महात्मा गांधींचे लोकविलक्षण अनुयायी: गोपराजू रामचंद्र राव' या दोन पुस्तकांचे डॉ. बंग यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

डॉ. बंग म्हणाले, महात्मा गांधींच्या अनुभवातून नई तालीम शिक्षणप्रणाली उदयास आली. या संकल्पनेचा विकास करणाऱ्या विनोबांकडून शिकलो, ही पुण्याई आहे. शिक्षणाचे उद्दिष्ट आपल्याला जीवनातच शोधावे लागते, हा नई तालीमचा गाभा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना जबाबदारी आणि बौद्धिक आव्हानही दिले जायचे. जीवनातली कर्तव्याबरोबर मिळणाऱ्या शिक्षणाला विनोबा स्वधर्म म्हणत. शरीरश्रम, बुद्धीला चालना यांसह प्रत्यक्ष जीवनात घडणाऱ्या शिक्षणाला गांधीजींनी नई तालीमचे स्वरुप दिले. प्रत्येकामध्ये ज्ञान असते त्यावरील अज्ञानाची पुटे शिक्षकांनी काढायचे असतात. महात्मा गांधी यांना सामान्य माणसामध्ये रस होता म्हणून जगभरात त्यांचे अनुयायी आहेत. ईश्वर हा सत्य आहे आणि त्यापुढेही जाऊन सत्य हाच ईश्वर आहे, असा झालेला प्रवास हा खूपच रोमांचक आहे.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, नई तालीम ही महात्मा गांधी यांनी जगाला दिलेली सर्वोत्तम भेट आहे. शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या आजच्या धुरिणांनी तिची आजच्या परिप्रेक्ष्यामध्ये कशा प्रकारे अंमलबजावणी करता येऊ शकेल.

डॉ. अशोक चौसाळकर यांनी 'महात्मा गांधी आणि त्यांचे सांगाती' या पुस्तकाविषयी आणि डॉ. भारती पाटील यांनी 'महात्मा गांधींचे लोकविलक्षण अनुयायी: गोपराजू रामचंद्र राव' या पुस्तकाविषयी व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. दशरथ पारेकर यांनीही पुस्तकांच्या लेखनप्रेरणेविषयी माहिती दिली. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

लोकमत

# वाणिज्य इमारतीचे उद्या भूमिपूजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या इमारतीचे उद्या शुक्रवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन होणार आहे. सायबर सिक्युरिटी व तंत्रज्ञान अधिविभागाच्या मध्य जागेत ही इमारत उभी करण्यात येणार आहे. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन प्र.कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे यांनी केले.

तरूण भारत

# वाणिज्य अधिविभागाच्या इमारतीचे उद्या भूमीपूजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या नूतन इमारतीचे भूमीपूजन शुक्रवार २० जून रोजी सकाळी १०.३० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. सायबर सिक्युरिटी व तंत्रज्ञान अधिविभागाच्या मध्य जागेत ही इमारत बांधण्यात येणार आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

तरूण भारत

# टेक्नोलॉजीच्या विद्यार्थ्यांची राधानगरी धरणाला भेट

प्रतिनिधी
कोल्हापूर

**▪ इंजिनिअरिंग प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास दौऱ्यात सहभाग**

शिवाजी विद्यापीठातील 'डिपार्टमेंट ऑफ टेक्नालॉजी'च्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी राधानगरी धरणास भेट दिली. हा अभ्यास दौरा डॉ. गिरीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिला होता, अशी माहिती विभागप्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील यांनी दिली. डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रा. डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना बेसिक सिव्हिल इंजिनीरिंगंतर्गत फील्ड व्हिजीट अभ्यासक्रम आहे. या भेटीमध्ये धरणाची उंची, पाण्याची साठवण क्षमता तसेच वीज निर्मिती केंद्रांची पाहणी केली. धरणाचे कार्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. प्रथमवर्ष इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांचा सहभाग होता. यासाठीं प्रा. महेश साळुंखे, प्रा. महेश लोखंडे, वैशाली शितूरकर, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.